**<u>वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज निशाणी क्रमांक ६७ वर</u>**

(पारीत केल्याचा दिनांक **२६ माहे जुलै, २०१७**)

**०१)** प्रस्तुत अर्ज अर्जदार / मयत वादी क्रमांक ०३ च्या वारसांनी वादी क्रमांक ०३ चे वारस अभिलेखावर वादीपणात सामील करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**०२)** प्रस्तावीत वादी / अर्जदारांचे कथन असे आहे की, वादी क्रमांक ०३ हे दिनांक २८.०२.२०१६ रोजी मयत झाले आहेत. माननीय नामदार उच्च न्यायालयात दाव्याकामी स्थगिती आदेश होता. म्हणून वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी मिळावी.

**०३**) प्रतिवादीने अर्ज कायदेशीर नाही असे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला.

**०४**) वादपत्राचे अवलोकन केले. वादपत्रावरुन वाद स्थावर मिळकतीचा असल्याचे स्पष्ट आहे. अर्जदार हे मयत वादी क्रमांक ०३ चे वारस आहेत. म्हणून त्यांना प्रतिवादींविरुद्ध दावा पुढे चालवण्याचा हक्क / अधिकार आहे.

**०५**) वादी क्रमांक ०३ मयत झाल्यापासून ९० दिवसात वारसांनी अर्ज दाखल करुन अभिलेखावर वादीपणात सामील होणे गरजेचे होते, परंतु त्यांनी तसे केले नाही. वादी क्रमांक ०३ चे मृत्यूनंतर ९० दिवस पुर्ण झाल्यावर आपोआप कायाद्यानुसार अबेटमेंट होत असते.

**०६)** अर्जदार / वादी क्रमांक ०३ च्या वारसांनी विलंब माफीसाठी दाखल केलेला अर्ज नि.क्र.६३ मंजूर झाला आहे.

**०७)** अर्जदार / वादी क्रमांक ०३ च्या वारसांनी अबेटमेंट रद्द होण्यासाठी दाखल केलेला अर्ज नि.क्र.६५ मंजूर झाला आहे.

**०८)** अर्जदार हे मयत वादी क्रमांक ०३ चे वारस आहेत. म्हणून त्यानां दावा चालवण्याची संधी देणे हिताचे आहे. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

**०१.** अर्जदार /वादी क्रमांक ०३ च्या वारसांनी वादी क्रमांक ०३ चे वारस म्हणजेच वादी क्रमांक ०३/१ ते ०३/६ यांना वादीपणात सामील करण्याची परवानगी मागण्यासाठी केलेला अर्ज मंजूर करण्यात येतो.

**०२.** अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करावा.

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष लक्ष्मण फुले)**
**(एम एच आर जी ०००९ - २१२५)**
**स्थळ : रोहा.** **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.**
**दिनांक : २६.०७.२०१७.** **जिल्हा रायगड.**